# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**


**प्रेस नोट क्र-१०७** **दिनांक - २२/०३/२०२४**

## रिक्षा चोराला अटक करुन ७ गुन्हांची उकल
## नवघर पोलीस ठाणे ची कामगीरी

नवघर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I १७४/२०२४ भा.दं.वि.सं.कलम-३७९ प्रमाणे दि.१९.०३.२०२४ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला होता. नमुद गुन्हयातील फिर्यादी श्री अभिमन्यु काशिराम कनोजीया वय ४० वर्षे,व्यवसाय- रिक्षा चालक ,रा.रुम नं जी-१०,उ वींग ,साई सम्राट सोसायटी, नवघर रोड, भाईंदर पुर्व हे रिक्षा चालक असुन ते MH-04-GN-6751 ही चालवतात. दि.१८/०३/२०२४ रोजी दिवसभर फिरवुन रात्री-२२.३० वा.चे सुमारास आशीष बार समोर रोडवर,नवघर फाटक रोड, भाईंदर पुर्व येथे पार्क केली. त्यानंतर ते त्यांचा राहते घरी निघुन गेले. दुस-या दिवशी दि.१९/०३/२०२४ रोजी सकाळी-०७.३० वा फिर्यादी हे पुन्हा रिक्षा चालवण्यासाठी त्यांची रिक्षा घेण्यासाठी घटनास्थळावर गेले असता त्यांची रिक्षा त्यांना पार्क केलेल्या ठिकाणी मिळुन आली नाही. त्यावेळी त्यांनी त्यांचा रिक्षाचा राहते परिसरात शोध घेतला मात्र त्यांची रिक्षा त्यांना कोठेही मिळुन आली नाही. त्यानंतर फिर्यादी यांची रिक्षा चोरी झाल्याबाबत खात्री झाल्याने त्यांनी पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिल्याने वर नमुदप्रमाणे गुन्हा नोद करण्यात आला होता.

नवघर पोलीस ठाणे हददीत मागील काहि दिवसांपासुन वारंवार रिक्षा चोरीचे गुन्हे होत होते. सदरची बाब ही गंभीर असल्याचे लक्षात घेवुन मा.पोलीस उप-आयुक्त सो. परिमंडळ-०१, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त सो. नवघर विभाग तसेच मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो. नवघर पेलीस ठाणे यांनी दिलेल्या सुचना, तसेच मागील काही दिवसांपासुन पोलीस ठाणे हददीतुन चोरी गेलेल्या रिक्षा चोरीच्या गुन्हयांचा तपासा दरम्यान प्राप्त केलेल्या सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज, तसेच वर नमुद गुन्हयातील घटनास्थळावरुन व घटनास्थळाचे आजुबाजुवरुन प्राप्त केलेले सीसीटीव्ही कॅमेरांचे फुटेज यांची एकत्रित पडताळणी केली असता गुन्हयातील संशयित आरोपी हा वारंवार येवुन रिक्षा चोरीचे गुन्हे करत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर अधिक तपास केला असता गुन्हयातील आरोपी हा चोरी करण्यासाठी बोरीवली, मुंबई येथुन आले असल्याचे समजले होते. त्याप्रमाणे नमुद संशईत आरोपी याचा सीसीटीव्ही फुटेजचे आधारे आय.सी कॉलनी बोरीवली पश्चिम परिसरात शोध घेतला असात इसम नामे शशीकांत मल्लेश कामनोर वय ३२ वर्षे ,व्यवसाय-रिक्षाचालक,रा.लींक रोड फुटपाथवर ,मंडपेश्वर मेट्रोस्टेशनच्या बाजुला,बोरीवली पश्चिम,मुंबई मुळगाव गंजीखेड, जि.गुलबर्गा, कर्नाटक हा मिळुन आला होता. नमुद आरोपी यास ताब्यात घेवुन त्याचा सदर गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास दि.१९/०३/२०२४ रोजी अटक करण्यात आली होती. आरोपी याचाकडे पोलीस कोठडीदरम्यान केलेल्या तपासात त्याचाकडुन एम.एच.बी.कॉलनी पोलीस ठाणे मुंबई तसेच नवघर पोलीस ठाणे अशा वेगवेगळया ठिकाणाहुन चोरी केलेल्या एकुन-०७ ऑटो रिक्षा अशी एकुन रुपये-७,६९,०००/- किंमतीची मालमत्ता हस्तगत करण्यात आलेली आहे. तसेच तपासा दरम्यान नवघर पोलीस ठाणे तसेच एम.एच.बी.कॉलनी पोलीस ठाणे मुंबई येथील रिक्षाचोरीचे एकुन-०७ गुन्हे उघडकीस आलेले आहे. सदर गुन्हयातील आरोपी याचे विरोधात भाईंदर पोलीस ठाणे गु.रं.नं. १२०५/२०१६ कलम ३९२ भादविस प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

**अटक आरोपी याचाकडे केलेल्या तपासात उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे-**

| अ.क्र | पोलीस ठाणे | गु.र.क्र व कलम |
|---|---|---|
| १ | नवघर पोलीस ठाणे | गु.र.क्र-५५/२०२४ कलम-३७९ भादवि |
| २ | नवघर पोलीस ठाणे | गु.र.क्र-१४७/२०२४ कलम-३७९ भादवि. |
| ३ | नवघर पोलीस ठाणे | गु.र.क्र-१५०/२०२४ कलम-३७९ भादवि. |
| ४ | नवघर पोलीस ठाणे | गु.र.क्र-१६०/२०२४ कलम-३७९ भादवि. |
| ५ | नवघर पोलीस ठाणे | गु.र.क्र-१७३/२०२४ कलम-३७९ भादवि. |
| ६ | नवघर पोलीस ठाणे | गु.र.क्र-१७४/२०२४ कलम-३७९ भादवि. |
| ७ | एम.एच.बी कॉलनी पोलीस ठाणे, मुंबई | गु.र.क्र-१०३/२०२४ कलम-३७९ भादवि. |

सदरची कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मि.भा-व.वि.पोलीस आयुक्तालय, श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त, श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०१, श्री.राजेंद्र मोकाशी सहा.पो.आयुक्त, नवघर विभाग यांचा मार्गदर्शनाखाली धिरज कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, नवघर पोलीस ठाणे, पोलीस निरीक्षक(गुन्हे) अशोक कांबळे, सपोनि संदिप पालवे, पोउनि-ज्ञानेश्वर आसबे, सफौ/गौतम तोत्रे, पोह-०७०९७/भुषण पाटील, ०६११७/संतोष पाटील, पोह-०७१६२/सुरेश चव्हाण, पोह-१२०१८/नवनाथ घुगे, पोशि-१३११८/ओंकार यादव, पोशि-१३०७८/सुरजसिंग घुनावत पोशि-अस्वर, पोशि-पवार तसेच मसुब/कुणाल हिवाळे यांनी केलेली आहे.

-------------ooooo-------------